पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ४४८ दिनांक - २१/०६/२०२३**

कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर

## मंगेश अनिल माने व त्याचे ०४ साथीदार यांचे विरुध्द मकोका कारवाई

कोंढवा पोलीस स्टेशन हद्दीत दि.२७/०३/२०२३ रोजी साईनगर गल्ली नं.२ कोंढवा पुणे येथे पवन राठोड यांनी फिर्यादी यांना बोलावुन घेऊन मंगेश माने व त्याचे इतर साथीदार यानी तु नीट रहा तुला पहिलेच सांगतो असे बोलुन फिर्यादीला लाथाबुक्यांनी मारहाण व शिवीगीळ करण्यास सुरुवात केली. फिर्यादी तेथुन पळुन जात असताना मंगेश माने व त्याचे इतर साथीदार यांनी त्यांना कोयत्याने मारहाण करुन जीवे मारण्याचा प्रयत्न केला.तसेच मंगेश माने याने त्याच्या हातातील कोयता फिरवत दहशत केली.त्याबाबत **कोंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर गु.र.नं.३२७/२०२३ भादविक.३०७,३२६,३२३,५०४,१४३,१४७,१४८ आर्म ॲक्ट कलम ४(२५)म.पो.का.क. ३७(१)(३)१३५ क्रि.लॉ.ॲ.कलम ३,७** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याच्या तपासा दरम्यान सदर गुन्हा हा **१)मंगेश अनिल माने,वय-२६ वर्षे,रा.सरगम चाळ, गल्ली क्रमांक १,अप्पर इंदिरानगर,बिबवेवाडी,पुणे (टोळी प्रमुख) (पाहिजे आरोपी) २)पवन रविंद्र राठोड ,वय-२३ वर्षे रा.साईनगर गल्ली नं.२,कोंढवा-बद्रुक,पुणे ३)सागर कृष्णा जाधव,वय-३० वर्ष,रा. सासवड,ता.पुरंदर,जि.पुणे व सरगम चाळ,६५८/१,अपर बिबवेवाडी,पुणे ४)अभिजीत उर्फ जब्या सुरेश दुधनीकर,वय-२१ वर्षे रा.गल्ली नं.४,गोकुळनगर,कात्रज,कोंढवा रोड,पुणे ५)सुरज पाटील (पाहिजे आरोपी)** यांनी केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्यांना दाखल गुन्ह्याचे तपासकामी **अ.नं.२ ते ४ यांना अटक करण्यात आली असुन ते सध्या येरवडा कारागृहात आहेत.**

आरोपी मंगेश माने (टोळी प्रमुख) याने दाखल गुन्ह्यातील साथीदार यांचे सह यापुर्वी देखील एकत्रित गंभीर स्वरुपाचे गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले.ते वारंवार आर्थिक फायद्यासाठी जबरी चोरी घातक हत्याराचा वापर करुन गंभीर दुखापत करुन जबरी चोरी,खुन,खुनाचा प्रयत्न,गंभीर दुखापत यासारखे गुन्हे संघटीतपणे करित असल्याचे पुर्व रेकॉर्डवरुन दिसुन आल्याने प्रस्तुत गुन्ह्यात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियत्रंण कायदा १९९९ चे कलम कलम-३(१)( ii),३(२),३(४) या कलमांचा अंतर्भाव करणेकामी कोंढवा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संतोष सोनवणे यांनी मा.पोलीस उप-आयुक्त. परिमंडळ-५ पुणे शहर श्री. विक्रांत देशमुख यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त.पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा यांना प्रस्ताव सादर केला होता.सदर प्रकरणाची छाननी करुन,कोंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर गु.र.नं. ३२७/२०२३,भादविक.३०७,३२६,३२३,५०४,१४३,१४७,१४८,आर्म ॲक्ट कलम ४(२५) म.पो.का.क.३७(१)(३)१३५, क्रि.लॉ.ॲ.कलम ३,७ या दाखल गुन्ह्यात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी प्रतिबंध अधिनियम सन १९९९ चे कलम-३(१)(ii),३(२),३(४) अंतर्भाव करण्याची परवानगी श्री.रंजनकुमार शर्मा अपर पोलीस आयुक्त.पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर यांनी मान्यता दिली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलीस आयुक्त,वानवडी विभाग,पुणे शहर,श्री.शाहुराजे साळवे हे करित आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा.पोलीस आयुक्त पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सहआयुक्त पुणे शहर श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा, मा. पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-५,पुणे शहर,श्री.विक्रांत देशमुख, सहा.पोलीस आयुक्त,वानवडी विभाग,पुणे श्रीमती.पौर्णिमा तावरे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,कोंढवा पोलीस स्टेशन,श्री.संतोष सोनवणे, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.संजय मोगले पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.संदिप भोसले,सहा.पोलीस निरीक्षक, विश्वास भाबड व सर्व्हेलन्स पथकातील अंमलदार,जगदिश पाटील, राजेंद्र ननावरे, नितीन चव्हाण, हणमंत रूपनवर यांनी केली आहे.

**मा.पोलीस आयुक्त पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियत्रंणावर बारकाईने लक्ष देऊन शरिराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांची हालचालीवर बारकाईने लक्ष ठेऊन गुन्हेगारचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्या बाबत सर्व पोलीस आधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. त्याचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली ही २९ वी कारवाई आहे.**